अर्धसाप्ताहिक

# ब्रम्हपुरी समाचार

गुढीपाडवा सणाच्या सर्वांना हार्दिक शुभेच्छा!

संपादक अशोक भैया

RNI No. MAHMUL/2016/69789

E-Mail ID : bramhapurisamachar@gmail.com

Postal Regd. No. G2/47/CHD-283/2023-25

गुरूवार, दि. 19 मार्च 2026 | वर्ष 11 वे | अंक 31 वा | ब्रम्हपुरी | पाने 6 | किंमत 2 रूपये

# शिक्षणाचे माहेरघर की मुली बेपत्ता होण्याचे केंद्र?

## ब्रम्हपुरीत १८ दिवसांत ६ मुली गायब; पालकांमध्ये भीतीचे सावट!

ब्रह्मपुरी/का.प्र.

ज्या शहराला विद्येचे माहेरघर आणि सुसंस्कृतपणाचा वारसा लाभला आहे, त्या ब्रह्मपुरी शहराला सध्या एका भीतीचा विळखा पडला आहे. अवघ्या १८ दिवसांच्या कालावधीत ६ अल्पवयीन मुली बेपत्ता झाल्याची धक्कादायक माहिती समोर आली असून, या घटनांनी संपूर्ण तालुका हादरून गेला आहे. 'लेक वाचवा'च्या घोषणा एका बाजूला घुमत असताना, प्रत्यक्षात मात्र घराबाहेर पडलेली 'लेक' सुरक्षित आहे का? हा प्रश्न आता प्रत्येक पालकाला सतावू लागला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, ब्रह्मपुरी पोलीस ठाण्याच्या हद्दीतून गेल्या १८ दिवसांत सहा वेगवेगळ्या ठिकाणांहून अल्पवयीन मुली बेपत्ता झाल्या आहेत. धक्कादायक बाब म्हणजे, यातील बहुतांश मुली या नेहमीप्रमाणे शाळेत किंवा कोचिंग क्लासला गेल्या होत्या. मात्र, क्लासची वेळ संपूनही त्या घरी परतल्या नाहीत. त्यांच्या सायकली कॉलेज आणि क्लासच्या परिसरात बेवारस स्थितीत सापडल्याने, हे साधे बेपत्ता होणे नसून सुनियोजित अपहरणाचे कटकारस्थान असल्याची भीती व्यक्त होत आहे.

पालकांनी दिलेल्या तक्रारींनुसार, अज्ञात व्यक्तींनी या मुलींना लग्नाचे आमिष दाखवून किंवा काहीतरी फूस लावून पळवून नेले असावे, असा दाट संशय आहे. एकापाठोपाठ एक घडणाऱ्या या सहा घटनांमुळे शहरात एखादी टोळी सक्रिय आहे का? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. भरदिवसा गर्दीच्या ठिकाणांहून मुली गायब होत असल्याने गुन्हेगारांचे धाडस शिगेला पोहोचल्याचे दिसून येते.

या प्रकरणांमुळे पोलीस यंत्रणेवर प्रचंड ताण आला आहे. पोलिसांनी सर्व सहा प्रकरणांत अपहरणाचे गुन्हे दाखल केले आहेत. ब्रह्मपुरी शहर हे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी शिक्षणाचे मुख्य केंद्र आहे. शेकडो मुली दररोज शिक्षणासाठी गावातून शहरात येतात. या पार्श्वभूमीवर प्रशासनाने पालकांना आवाहन करताना म्हटले की, आपल्या मुलांच्या रोजच्या हालचालींवर बारकाईने लक्ष ठेवा. मुलांशी मैत्रीपूर्ण संवाद साधा, जेणेकरून ते त्यांच्या मनातील भीती किंवा प्रलोभने तुम्हाला सांगू शकतील. अनोळखी व्यक्तींच्या कोणत्याही आमिषाला बळी पडू नये, असे संस्कार त्यांच्यावर करा. असे सांगून सतर्क केले आहे.

१८ दिवसांतील या ६ घटनांनी ब्रह्मपुरीचे समाजमन सुन्न झाले असून, आता सर्वांच्या नजरा पोलीस तपासाकडे लागल्या आहेत. आपल्या लेकी पुन्हा सुखरूप घरी येतील का? याच चिंतेत आज ब्रह्मपुरीतील अनेक घरे अंधारात आहेत.

**'शिक्षण घेण्यासाठी येणाऱ्या मुलींच्या सायकली स्टँडवर राहतात, पण मुली घरी परतत नाहीत, ही बाब समाजासाठी आणि प्रशासनासाठी अत्यंत खेदजनक आहे. सुरक्षिततेचा प्रश्न तातडीने सुटणे गरजेचे आहे.'**

**- एक चिंतेत असलेला पालक.**

# विक्री केलेली कार मालकाच्या घरूनच चोरली!

## सेवानिवृत्त शिक्षकाची ४.३० लाखांनी फसवणूक

ब्रम्हपुरी/का.प्र.

एका निवृत्त शिक्षकाला विश्वासात घेऊन कारची विक्री करणे आणि नंतर तो व्यक्ती शहराबाहेर असल्याची संधी साधून विकलेली कार मध्यरात्री घरूनच चोरून नेण्याचा खळबळजनक प्रकार ब्रम्हपुरी येथे उघडकीस आला आहे. याप्रकरणी कुरखेडा येथील तिघांविरुद्ध पोलीस स्टेशन ब्रम्हपुरी येथे तक्रार दाखल करण्यात आली आहे.

ब्रम्हपुरी येथील रहिवासी आणि सेवानिवृत्त शिक्षक प्रमोद गंभीर मेश्राम (६०) यांना कार खरेदी करायची होती. ओळखीच्या मध्यस्थांमार्फत त्यांचा संपर्क कुरखेडा येथील सौ. चेतना रोशन कुंभलवार आणि रोशन कुंभलवार यांच्याशी झाला. त्यांच्या मालकीची महिंद्रा XUV 300 (क्र. MH 33 AC 0520) ही गाडी मेश्राम यांना आवडली.

दिनांक ७ ऑक्टोबर २०२५ रोजी या गाडीचा व्यवहार ५,५०,००० रुपयांत ठरला. त्यापैकी ४,३०,००० रुपये मेश्राम यांनी कुंभलवार पती-पत्नीला रोख स्वरूपात दिले. गाडीवर फायनान्स असल्याने तो क्लिअर करून उर्वरित रक्कम दिल्यावर कागदपत्रे नावावर करण्याचे ठरले होते. तोपर्यंत गाडीची चावी आणि ताबा मेश्राम यांच्याकडे देण्यात आला होता.

फेब्रुवारी २०२६ मध्ये मेश्राम हे आपल्या मुलीच्या प्रसुतीसाठी हैदराबाद येथे गेले होते. घरी फक्त त्यांची पत्नी होती. १९ फेब्रुवारीच्या रात्री संशयित आरोपींचा चालक संकल्प राऊत याने मेश्राम यांना फोन करून ते कुठे आहेत याची खात्री केली. मेश्राम हैदराबादला असल्याचे कळताच, त्याच रात्री ११:२८ च्या सुमारास आरोपींनी घरासमोर उभी असलेली कार चोरून नेली. दुसऱ्या दिवशी गाडी गायब असल्याचे लक्षात येताच मेश्राम तातडीने ब्रम्हपुरीला परतले. घराचे सीसीटीव्ही फुटेज तपासले असता, चालक संकल्प राऊत हा गाडी घेऊन जाताना स्पष्ट दिसला. मेश्राम यांनी मूळ मालक रोशन कुंभलवार यांच्याशी संपर्क साधला असता, त्यांनी उद्धटपणे उत्तर दिले की, 'आम्हीच आमच्या सांगण्यावरून गाडी पळवून आणली आहे, आम्हाला आता गाडी विकायची नाही.

गेल्या अनेक दिवसांपासून मेश्राम हे आपल्या पैशांची मागणी करत आहेत, मात्र आरोपी पैसेही परत करत नाहीत आणि गाडीही देत नाहीत. उलट, वारंवार वेगवेगळी कारणे सांगून वेळ मारून नेत आहेत. अखेर आपली फसवणूक झाल्याचे लक्षात येताच प्रमोद मेश्राम यांनी पोलीस स्टेशन ब्रम्हपुरी येथे धाव घेऊन चेतना रोशन कुंभलवार, रोशन कुंभलवार , संकल्प राऊत (चालक) यांच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम ३०३(२), ३१८ (३ ) , ३२३ , ३ (५ ) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.




ब्रम्हपुरी समाचार अंक नियमित वाचनाकरीता
www.bramhapurisamachar.com/bs
या वेबसाईटवर लॉगीन करा...

## संपादकीय...

# एकमेव पर्याय जैविक इंधन!

दरवर्षी भारतात मोठ्या प्रमाणात जैविक कचरा निर्माण होतो. यामध्ये शेतातील पिकांचे अवशेष, पशुधनाचे शेण, शहरातील ओला कचरा आणि बाजारातून निर्माण होणारा अन्नकचरा यांचा समावेश होतो. या सर्वांचा उपयोग बायोगॅस आणि कॉम्प्रेस्ड बायोगॅस तयार करण्यासाठी करता येतो. या गॅसचा उपयोग स्वयंपाक, वीज निर्मिती किंवा वाहने चालवण्यासाठी केला जाऊ शकतो. हे लक्षात घेऊन केंद्र सरकारने 'सस्टेनेबल अल्टरनेटिव्ह टुव अफोर्डेबल ट्रान्सपोर्टेशन' (SATAT) ही योजना सुरू केली आहे. या योजनेचे उद्दिष्ट देशात कॉम्प्रेस्ड बायोगॅस प्रकल्प उभारणे आणि जैविक कचऱ्याचे इंधनात रूपांतर करणे आहे. मागील काही वर्षांत देशात असे अनेक प्रकल्प उभे राहिले असून त्यातून गॅस उत्पादनही सुरू झाले आहे.

जर या व्यवस्थेचा विस्तार झाला, तर त्याचा परिणाम केवळ शहरांच्या स्वयंपाकघरांपुरता मर्यादित राहणार नाही. कृषी, शहरी व्यवस्थापन, उद्योग आणि परिवहन अशा अनेक क्षेत्रांवर त्याचा प्रभाव पडू शकतो. भारताच्या शेतांतून दरवर्षी लाखो टन पिकांचे अवशेष आणि पशुधनाचे शेण निर्माण होते. या पदार्थांवर प्रक्रिया करण्यासाठी मोठे बायोगॅस प्रकल्प उभारले जाऊ शकतात. जर असे प्रकल्प गावांमध्ये आणि सहकारी संस्थांच्या माध्यमातून विकसित केले गेले, तर दरवर्षी मोठ्या प्रमाणात गॅस तयार होऊ शकतो. यामुळे ग्रामीण भागात अतिरिक्त उत्पन्नाचा स्त्रोतही निर्माण होऊ शकतो. शेण आणि कृषी अवशेषांपासून गॅस तयार करण्याचे काही प्रयोग पंजाब आणि महाराष्ट्र सारख्या राज्यांत आधीच सुरू झाले आहेत. शेतकरी आपल्या जनावरांचे शेण किंवा शेतातील अवशेष गॅस प्रकल्पांपर्यंत पोहोचवतात आणि त्याबदल्यात त्यांना पैसे मिळतात. प्रकल्पात तयार होणारी गॅस इंधन म्हणून वापरली जाते, तर उरलेला अवशेष सेंद्रिय खत म्हणून पुन्हा शेतात परत जातो. अशा प्रकारे एक चक्र तयार होते कचरा शेतातून बाहेर पडतो आणि खत बनून पुन्हा शेतात परत येतो. अशी शक्यता शहरांमध्येही आहे. भारतीय शहरांतून दरवर्षी सुमारे सहा कोटी टन घनकचरा निर्माण होतो, ज्यातील अर्ध्याहून अधिक जैविक असतो. जर हा कचरा वेगळा करून बायोगॅस प्रकल्पांपर्यंत पोहोचवला, तर मोठ्या प्रमाणात गॅस तयार होऊ शकतो.

इंदौर शहराने चांगल्या कचरा व्यवस्थापनासोबत बायोगॅस प्रकल्पांवर काम केले आहे, जिथे ओल्या कचऱ्यापासून ऊर्जा तयार करण्याची सुरुवात झाली आहे. जमशेदपूर येथेही अन्नकचऱ्याचे बायोगॅसमध्ये रूपांतर करण्याचे प्रयोग झाले आहेत. जर महानगरपालिका बाजार, हॉटेल्स आणि घरांमधील ओला कचरा व्यवस्थितपणे गोळा करून बायोगॅस प्रकल्पांकडे पाठवतील, तर शहरांना दोन फायदे होऊ शकतात. एक म्हणजे कचऱ्याचे प्रमाण कमी होईल आणि दुसरे म्हणजे गॅसचा स्थानिक स्त्रोत तयार होईल. अन्न प्रक्रिया, डेअरी किंवा वस्त्रोद्योग अशा अनेक लघु व मध्यम उद्योगांत जैविक कचरा निर्माण होतो. जर हे उद्योग आपल्या परिसरात छोटे बायोगॅस प्रकल्प उभारतील, तर ते त्यांच्या ऊर्जा गरजांचा काही भाग स्वत: पूर्ण करू शकतात. यामुळे एलपीजी किंवा इतर इंधनांवरील खर्चही कमी होऊ शकतो. देशात आधीच सीएनजीवर चालणारी वाहने आहेत आणि त्याच संरचनेत बायोगॅसवर आधारित इंधनाचाही वापर करता येऊ शकतो. काही शहरांमध्ये ऑटो-रिक्शा आणि छोटे ट्रक अशा इंधनाचा वापर करू लागले आहेत. तथापि, हे मानणे घाईचे ठरेल की बायोगॅस अचानक भारताच्या संपूर्ण ऊर्जा गरजा पूर्ण करेल. देशातील गॅसची एकूण मागणी खूप मोठी आहे. परंतु कृषी, शहर, उद्योग आणि परिवहन क्षेत्रातील छोटे प्रयत्न एकत्र आले, तर त्याचा परिणाम हळूहळू दिसू शकतो. उत्साहवर्धक बाब म्हणजे आता अनेक लहान, विकेंद्रित आणि सहज स्थापित करता येणाऱ्या बायोगॅस प्रणाली उपलब्ध आहेत. सध्या भारतात मोठ्या प्रमाणात जैविक कचरा वाया जातो. शेतांमध्ये पिकांचे अवशेष जाळले जातात, शहरांमध्ये ओला कचरा लँडफिलमध्ये टाकला जातो आणि स्वयंपाकघरातील कचरा शहराबाहेर फेकला जातो. परंतु जर याच कचऱ्याकडे संसाधन म्हणून पाहिले, तर परिस्थिती पूर्णपणे बदलू शकते. कदाचित आज जी गोष्ट समस्या मानली जाते, तोच कचरा भविष्यात भारतासाठी लहान पण स्थिर इंधनाचा स्रोत बनू शकतो.

# ने.हि. महाविद्यालयात विज्ञान सप्ताह साजरा

ब्रह्मपुरी/का.प्र.

येथील नेवजाबाई भैया हितकारिणी एज्युकेशन सोसायटी द्वारा संचालित नेवजाबाई हितकारिणी महाविद्यालय,ब्रह्मपुरी येथे राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त आयोजित 'विज्ञान सप्ताह २०२६' चा भव्य आयोजन करण्यात आले. यानिमित्ताने घेण्यात आलेल्या स्पर्धांचे पारितोषिक वितरण पाहूण्यांचे हस्ते करण्यात आले. यात वैज्ञानिक दृष्टिकोन आणि नाविन्यपूर्ण कल्पकतेला वाव देण्यासाठी २५ ते २८ फेब्रुवारी दरम्यान या सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते.



या सप्ताहाची सुरुवात भौतिकशास्त्र आणि गणित विभागाच्या वतीने आयोजित 'सेमिनार'ने झाली तसेच वनस्पतीशास्त्र विभागातर्फे कथाकथन व निबंध स्पर्धा घेण्यात आल्या. सप्ताहाच्या इतर दिवशी विविध विभागांमार्फत वैविध्यपूर्ण स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. यात रसायनशास्त्र विभागाद्वारे प्रश्नमंजूषा, प्राणीशास्त्र विभागतर्फे वन्यजीव छायाचित्रण स्पर्धा, इलेक्ट्रॉनिक्स व संगणक शास्त्र विभागच्या वतीने मॉडेल प्रदर्शन आणि पोस्टर स्पर्धा, सूक्ष्मजीवशास्त्र विभागाद्वारे 'शाश्वत विकासासाठी विज्ञान आणि तंत्रज्ञान' या विषयावर आधारित रांगोळी स्पर्धा घेण्यात आली.

या स्पर्धांचे पारितोषिक वितरण आणि समारोप महाविद्यालयाच्या स्व. हिरालालजी भैया सभागृहात पार पडला. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नेवजाबाई भैया हितकारिणी शिक्षण संस्थेचे सचिव अशोक भैया होते तर प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे ज्येष्ठ सदस्य प्रा. एस. आर. बजाज उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ.एस. एम. शेकोकार यांनी केले. त्यांनी विद्यार्थ्यांमधील वैज्ञानिक प्रतिभा विकसित करण्यावर भर दिला. या सप्ताहाचे यशस्वी नियोजन समन्वयक डॉ. वाय. पी. ठावरी, रसायनशास्त्र विभागप्रमुख आणि आयोजक डॉ.आर. एस.मेश्राम प्रमुख, भौतिकशास्त्र विभागप्रमुख यांनी केले. या विज्ञान सप्ताहामुळे विद्यार्थ्यांमध्ये विज्ञानाबद्दलची ओढ वाढण्यास मदत झाली.

# रेती व्यावसायिकाकडून खंडणी वसूल करणाऱ्या राजकीय पुढारी व पत्रकारावर गुन्हा दाखल

ब्रह्मपुरी /का.प्र.

राजकीय ओळख आणि मीडियाचा धाक दाखवून एका रेती व्यावसायिकाला लाखो रुपयांनी गंडा घालणाऱ्या आणि खोट्या व्हिडिओच्या माध्यमातून बदनामी करण्याची धमकी देणाऱ्या दोन आरोपींविरुद्ध ब्रह्मपुरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. 'आम आदमी पार्टी'चा पदाधिकारी असल्याचे सांगणारा मुख्य आरोपी आणि एका न्यूज पोर्टलचा पत्रकार यांच्या या संगनमताने शहरात मोठी खळबळ उडाली आहे.

फिर्यादी सौरभ अनिल रामटेके (वय ३०, रा. कुर्झा वार्ड) हे आपल्या ट्रॅक्टरने रेती वाहतुकीचा व्यवसाय करतात. आरोपी नावेद खान याने फिर्यादीला आपण 'आम आदमी पार्टी'चे असून बड्या अधिकाऱ्यांशी आपले संबंध असल्याचे भासविले. नदी घाटातून रेती वाहतुकीसाठी कोणतीही अडचण येऊ देणार नाही, असे आश्वासन देऊन त्याने सौरभ यांचा विश्वास संपादन केला. या विश्वासापोटी फिर्यादीने आपल्या पत्नीचे मंगळसूत्र सोनाराकडे विकून ५०,००० रुपये आरोपी नावेद खानला दिले. एवढेच नव्हे तर, दरमहा ५०,००० रुपये आणि रोजचे २,००० रुपये रोख किंवा ऑनलाईन स्वरूपात आरोपी उकळत होता.

काही दिवसांपूर्वी महसूल विभागाने फिर्यादीचे ट्रॅक्टर रेती वाहतूक करताना पकडले. यावेळी मदतीसाठी धावून येण्याऐवजी आरोपी नावेद खान याने फिर्यादीला धमकावण्यास सुरुवात केली. 'तू तहसीलदार ब्रह्मपुरी यांच्याविरुद्ध जातिवाचक शिवीगाळ केली आहे आणि ५० हजार रुपयांची मागणी केली आहे,' असा खोटा आरोप लावून त्याने फिर्यादीचा व्हिडिओ बनवला.

या कटात आरोपी क्रमांक २ रोहित मेश्राम (पत्रकार, लोक ९ न्यूज मराठी) यालाही सामील करून घेण्यात आले. या दोघांनी संगनमत करून फिर्यादीला जबरदस्तीने न्यूज चॅनेलवर मुलाखत देण्यास भाग पाडले आणि त्यांची सामाजिक बदनामी केली. या व्हिडिओचा आधार घेऊन आरोपी वारंवार खंडणीची मागणी करत होते. अखेर सौरभने पोलीसांत तक्रार दिली. पोलिसांनी घटनेचे गांभीर्य ओळखून आरोपींविरुद्ध भारतीय न्याय संहिता (BNS) कलम ३०८(२), ४९, ३(५), ३५१(२), ३५२ कलमान्वये गुन्हा नोंदवला आहे.

## विनोदिनी

पप्पू के घर के दरवाज़े के ताले की चाबी खो गई... बहुत ढुंढने पर भी नहीं मिली... तो उसने दरवाज़ाही निकाला और कंधे पे रख के बाज़ार मे ठीक करने गया...

एक आदमी ने पूछा : ओ भाई, क्या दरवाज़ा बेचना है ???

पप्पू : नहीं, ताला खुलवाना है, चाबी गुम हो गई है...

जोक अभी आगे है :

हँसो मत !!!

आदमी पप्पू से : अगर घर मे चोर घुस गये तो ???

पप्पू : अंदर कैसे जाएगा ??? दरवाज़ा तो मेरे पास है..!! और चाबी भी नहीं है...!!!

# महाराजस्व समाधान शिबीरातून शासनाचा लाभ थेट जनतेच्या दारी

ब्रम्हपुरी/का.प्र.

मेंडकी येथे महसूल विभागांतर्गत क्षेत्रिय स्तरावर ग्रामिण भागात सर्वसामान्य जनता, शेतमजूर, शेतकरी बांधव, आणि विद्यार्थी व महिला यांचे महसूल विभागांशी संबंधित दैनंदिन प्रश्नांचे निराकरण करणे व जनतेच्या तक्रारी स्तरावर निकाली काढणे, तसेच महसूल प्रशासन अधिक लोकाभिमुख, कार्यक्षम व गतिमान करण्यासाठी राज्यातील प्रत्येक जिल्ह्यातील तालुक्यामध्ये मंडळ स्तरावर 'छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभियान' आयोजित



करण्याबाबत शासनाने निर्णय घेतलेला आहे.

ज्याप्रमाणे छत्रपती शिवाजी महाराजांनी रयतेचे राजे म्हणून प्रत्येक घटकाला स्वतंत्र, सुरक्षित न्याय दिले. शिवाजी महाराजांनी शेतकऱ्यांच्या पिकांचे नुकसान झाल्यास करमाफी, शेतकऱ्यांच्या पिकांच्या देठालाही हात लावू नये, स्त्रियांचा सन्मान, शेतकरी सामान्य नागरिकांसाठी सन्मान न्याय, शेतीसाठी सवलती इत्यादी सोई सुविधा दिल्या होत्या. त्याचाच एक भाग म्हणून दिनांक १४/३/२०२६ रोजी महसूल विभागामार्फत 'छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभियान' आयोजित करण्यात आले होते. या अभियानाचा शुभारंभ नुकताच मेंडकी येथे प्रांत अधिकारी पर्वणी पाटील, यांच्या उपस्थित करण्यात आला.

यावेळी तहसीलदार सतीश मासाळ, नायब तहसीलदार लीना बोबाटे, नायब तहसीलदार महानंदा मडावी, नायब तहसीलदार प्रशांत धकाते, निरीक्षक अधिकारी अमित कांबळे, उप अधिक्षक भूमी अभिलेख गोरखा, दुय्यम निबंधक जयंत मडावी, तसेच मेंडकीचे सरपंच आदी उपस्थित होते. महसूल प्रशासन अधिक लोकाभिमुख, कार्यक्षम व गतिमान करून नागरिकांना शासकीय सेवांचा लाभ एकाच ठिकाणी मिळावा, यासाठी महाराजस्व अभियान राबविण्यात येत आहे. कार्यक्रमादरम्यान विविध विभागाच्या लाभार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते १८० लाभार्थ्यांना विवीध प्रमाणपत्र व दाखल्याचे वाटप करण्यात आले. आणि सोबतच नेत्र शिबिरामध्ये १०९ लाभार्थ्यांनी नेत्र तपासून घेतले यावेळी प्रांत अधिकारी पर्वणी पाटील आणि सर्व विभागाच्या अधिकाऱ्यांनी नागरिकांच्या समस्या जाणून घेतल्या व त्यांच्या शंकांचे निराकरण केले. अभियानात जवळपास ४०० ते ५०० नागरिकांनी उपस्थिती दर्शवली.

# कला-क्रीडा महोत्सव स्पर्धेत ने.हि. महाविद्यालय अव्वल

## समूहगीत, एकलगीत स्पर्धेत प्रथम, लघुनाटिकेत द्वितीय तर बॅडमिंटन स्पर्धेत अव्वल

ब्रह्मपुरी/का.प्र.

गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली अंतर्गत प्राध्यापकांसाठी कला महोत्सवात




विद्यापीठात ज्या स्पर्धा पार पडल्या त्यात ब्रह्मपुरीच्या नेवजाबाई हितकारिणी महाविद्यालयातील प्राध्यापकांनी अव्वल स्थान प्राप्त केले आहे, त्यामुळे सर्वांकडून या चमूचे कौतुक करण्यात येत आहे.

यात समूहगीत स्पर्धेत डॉ.धनराज खानोरकर, डॉ असलम शेख, डॉ मिलिंद पठाडे, प्रा आकाश मेश्राम यांनी 'आता उठवू सारे रान' हे समूहगीत गाऊन प्रथम क्रमांक पटकावला तर एकलगीत स्पर्धेत डॉ मिलिंद पठाडे यांना प्रथम व लघुनाटिका स्पर्धेत डॉ धनराज खानोरकर यांना द्वितीय क्रमांक मिळाला. याशिवाय रस्सीखेचमध्ये डॉ असलम शेख, डॉ मिलिंद पठाडे, प्रा आकाश मेश्राम, प्रा धिरज आतला, संजू मेश्राम यांना तृतिय क्रमांक, चेस तृतिय प्रा आकाश मेश्राम तर चेस फिफ्थ डॉ असलम शेख, बॅडमिंटन डबलमध्ये प्रथम डॉ योगेश ठावरी, प्रा आकाश मेश्राम, द्वितीय प्रा धिरज आतला, प्रा जयेश हजारे यांनी पटकावून विद्यापीठात अव्वल स्थान प्राप्त केले. सर्वांना विद्यापीठाच्या बक्षीस वितरणात गौरविण्यात आले. यावेळी संचालक डॉ अनिता लोखंडे, व्यवस्थापन सदस्य डॉ.गोर्लावार सर, सिनेट सदस्य डॉ.रुपेंद्र गौर, प्राचार्य डॉ नंदाजी सातपुते, डॉ.निळकंठ नरवाडे उपस्थित होते. संचालन व आभार डॉ हेमराज निखाडेनी केले.

या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष श्रीमती स्नेहलताताई भैया, उपाध्यक्ष ॲड प्रकाश भैया, सचिव अशोक भैया, सदस्य प्रा.सुभाष बजाज, गौरव भैया, प्राचार्य डॉ सुभाष शेकोकर, समस्त प्राध्यापक वृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी सर्व विजेत्यांचे हार्दिक अभिनंदन करुन त्यांना शुभेच्छा दिल्या आहेत.

# कोसंबी खड. येथे शहीद बाबुराव शेडमाके यांची १९३ वी जयंती उत्साहात संपन्न

ब्रम्हपुरी/का.प्र.

शहीद स्वातंत्र्यवीर बाबुराव पुल्लेसुर शेडमाके यांच्या १९३ व्या जयंती निमित्ताने गोंडवाना समिती व आदिवासी समाज बांधव कोसंबी खडसमारा यांच्या वतीने दिनांक १२ मार्च २०२६ रोजी भव्य समाज प्रबोधन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या सोहळ्यात प्रमुख मार्गदर्शक म्हणून भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे लढाऊ नेते कॉम्रेड विनोद झोडगे पाटील उपस्थित होते.

प्रसंगी सकाळी ८ वाजता गावातून ढोल-ताशांच्या गजरात वीर बाबुराव शेडमाके यांच्या स्मृतींना अभिवादन करण्यासाठी रॅली काढण्यात आली. दुपारी मान्यवरांच्या उपस्थितीत समाज प्रबोधन झाले, तर रात्री पारंपरिक गोंडी नृत्य व सांस्कृतिक कार्यक्रमांची रेलचेल होती. याप्रसंगी मार्गदर्शन करताना कॉ. विनोद झोडगे यांनी शहीद बाबुराव शेडमाके यांच्या ऐतिहासिक संघर्षावर प्रकाश टाकला. ते म्हणाले की, '१८५७ च्या लढ्यात तत्कालीन चांदा जिल्ह्यातून ब्रिटिशांविरुद्ध दंड थोपटून इंग्रज राजवट हादरवून टाकण्याचे महान कार्य शेडमाके यांनी केले. त्यांचे बलिदान आणि लढण्याची जिद्द आजही आपल्यासाठी प्रेरणादायी आहे. त्यांच्या विचारांचा वारसा घेऊन समाजापुढील समस्या सोडवण्यासाठी आपण सदैव तत्पर आणि कृतिशील राहिले पाहिजे.'

या सोहळ्याला ओविदास उईके, मोरेश्वर उइके, अध्यक्ष एकनाथ कोटनाक, सरपंच संगीता जेंगटे, दिवाकर झाडे, शालुताई जुमनाके, धनराज सुरपाम, सानिया कुमरे, नामदेव वलके, गुलाब वलके, संचित वाळवे, रंजना आत्राम, वनिता उइके, जिजाबाई राऊत, छत्रपती सुरपाम, संजय गेडाम, दिलीप घोडाम, बागडे वनरक्षक, सुधाकर कुमरे यांच्यासह आवळगाव, मूडझा आणि वांद्रा परिसरातील आदिवासी बांधव उपस्थित होते.

# महाज्योतीच्या योजना योग्य प्रकारे राबवाव्या - प्रा. प्रकाश बगमारे

ब्रह्मपुरी/का.प्र.

महात्मा ज्योतिराव फुले संशोधन व प्रशिक्षण संस्थेमार्फत (महाज्योती) राबविण्यात येणाऱ्या विविध स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण योजनांमध्ये झालेल्या दिरंगाईमुळे लाखो विद्यार्थ्यांचे नुकसान झाले. गेल्या सहा महिन्यापासून या प्रशिक्षण प्रक्रियेत विलंब झाला. सुमारे ५०० कोटी रुपयाचा निधी उपलब्ध असूनही तो खर्च न करता अधिकाऱ्यांनी दिरंगाईचा कळस गाठला. या विद्यार्थ्यांचे नुकसान करणाऱ्या अधिकाऱ्यांची चौकशी करून कारवाई करण्याची मागणी भाजपा ओबीसी मोर्चा प्रदेश सचिव प्रा प्रकाश बगमारे यांनी केली आहे

महाजोती संस्थेमार्फत आय बी पी एस, रेल्वे, कर्मचारी निवड आयोग, मिलिटरी, पोलीस भरती, एमबीए - सीईटी तसेच नेट -सेट अशा विविध स्पर्धा परीक्षांसाठी प्रशिक्षण योजना राबविण्यात येतात. मात्र गेल्या सहा महिन्यापासून या प्रशिक्षण प्रक्रियेत झालेल्या विलंबामुळे हजारो विद्यार्थ्यांचे नुकसान होत आहे. महाज्योती संस्थेमार्फत स्पर्धा परीक्षा प्रशिक्षणासाठी ४९ हजार ३५८ विद्यार्थ्यांचे अर्ज प्राप्त झाले, मात्र अद्याप निकाल जाहीर करण्यात आलेला नाही. ऑगस्ट २०२५ मध्ये महा- इ- टेंडर प्रणालीद्वारे प्रशिक्षण संस्थांची निवड करण्यासाठी निविदा प्रक्रिया सुरू करण्यात आली होती . या प्रक्रियेला सहा महिन्याहून अधिक कालावधी उलटूनही निविदा अंतिम न झाल्याने प्रशिक्षण सुरू होऊ शकलेले नाही. त्यामुळे विद्यार्थ्यांना प्रशिक्षण घेता आले नाही.

ओबीसी विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी खेळ केला जात असल्याचा आरोप प्रा प्रकाश बगमारे यांनी केला. महाज्योतीच्या कारभाराची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी भाजपा प्रदेश सचिव प्रा प्रकाश बगमारे यांनी केली आहे आणि स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण लवकरात लवकर सुरू करून विद्यार्थ्यांचे नुकसान टाळावे, अशी मागणीही प्रा प्रकाश बगमारे यांनी केली आहे.

जल है तो कल है...

# गॅस सिलेंडर दरवाढीचा ब्रम्हपुरीत काँग्रेस पक्षाकडून निषेध, मुख्यमंत्र्यांना निवेदन

ब्रम्हपुरी/का.प्र.

शासनाने गॅस सिलेंडरच्या दरामध्ये अचानकपणे फार मोठी वाढ केलेली असून गॅस सिलेंडरच्या नोंदणीचा कालावधी सुद्धा वाढविला आहे. याचा विपरीत परिणाम राज्यातील प्रत्येक कुटुंबावर होणार आहे. अच्छे दिनाचे स्वप्न दाखविणाऱ्या शासनाने मोठ्या प्रमाणात गॅस दरवाढ करून जनतेचा विश्वासघात केला आहे. या विरुद्ध ब्रम्हपुरीत काँग्रेस पक्षाच्या वतीने




निषेध नोंदविण्यात आला व उपविभागीय अधिकारी यांच्या मार्फतीने मुख्यमंत्री यांना निवेदन सादर करण्यात आले.

यावेळी तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष खेमराज तिडके, शहर काँग्रेस कमिटी अध्यक्ष हितेंद्र राऊत, कृउबा सभापती प्रभाकर सेलोकर, माजी जि.प.सदस्य प्रमोद चिमुरकर, नगराध्यक्ष योगेश मिसार, न.प.उपाध्यक्ष डॉ.नितीन उराडे, नेताजी मेश्राम, न.प.नियोजन सभापती सचिन राऊत, न.प.पाणीपुरवठा सभापती सतीश हुमने, न.प.आरोग्य सभापती मनोज कावळे, नगरसेवक मोंटु पिलारे, नगरसेवक राकेश पडोळे, नगरसेवक चंद्रकांत बावनकुळे, नगरसेवक वकार खान, नगरसेवक पुष्पाकर बांगरे, महीला काँग्रेस अध्यक्ष योगिताताई आमले, महीला व बालकल्याण सभापती बबीताताई आमले, नगरसेविका रंजनाताई पीसे, नगरसेविका सपनाताई बल्लारपुरे, नगरसेविका रेणुताई ठेंगरी, नगरसेविका जयश्रीताई कुथे, नगरसेविका गिताताई मेश्राम, नगरसेविका ज्योतीताई राऊत, नगरसेविका रंजनाताई बुराडे, नगरसेविका हेमलता सिंहगडे, सुधाकर पोपटे, वासुभाऊ सोंदरकर, गाजी पटेल, प्रा.डि.के.मेश्राम, गूरुदेव वाघरे, रुपेश बानबले, वामन मिसार, जनसंपर्क अधिकारी सुधीर पंदीलवार, उपसरपंच संदीप बगमारे, अरुण अलोने, राममोहन ब्राडीया, जाकीर शेख, सरपंच उमेश धोटे, शहर काँग्रेस उपाध्यक्ष सुनिल विखार, केशव भुते, नेताजी पिसे, ब्रम्हदेव दिघोरे, किशोर राऊत, रवी मैंद, राहुल ठेंगरी, रिंकु पठाण, इक्बाल जेसानी, इंजी.अमोल सुकारे, सुधीर शिवरकर, अनमोल राऊत, सुधाताई राऊत, सुशीलाताई सोंडवले, रश्मी पगाडे, कमलेश मुळे, विलास दाणी, डेनी शेंडे, मुकुंदा राऊत, नितीन निहाटे, तुलचंद शिंगाडे, कृउबा संचालक किशोर बगमारे, गिरीश बुराडे, राहुल नेवारे, विलास मंडपे, नंदू भानारकर, जगदीश कलंत्री, सुरेश वंजारी, गोपी चिंचोळकर यांसह मोठ्या संख्येने काँग्रेस पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# ख्रिस्तानंद विद्यालयात पदवीदान समारंभ संपन्न




ब्रह्मपुरी/का.प्र.

स्थानिक ख्रिस्तानंद स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज येथे के.जी. 2 या वर्गाच्या विद्यार्थ्यांचे पदवीदान समारंभ नुकताच संपन्न झाला. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून ख्रिस्तानंद विद्यालयाचे व्यवस्थापक फादर कुरियन तर प्रमुख अतिथी म्हणून ब्रह्मपुरी पंचायत समितीच्या गटशिक्षणाधिकारी डॉ. विद्या शेळके, मुख्याध्यापिका सिस्टर पावना उपमुख्याध्यापिका सिस्टर अंजली,शिक्षक पालक संघाचे प्रतिनिधी चेतन फापट प्रामुख्याने उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या निमित्ताने नर्सरी ते के.जी. 2 या वर्गातील एवल्याशा बालकांनी 'माझा परिवार' या संकल्पनेवर आधारित नृत्य तसेच लघुनाटीका अप्रतिमरीत्या सादर करून प्रेक्षकांची मने जिंकली. याप्रसंगी सर्व अतिथींच्या उपस्थितीत केजी टू च्या विद्यार्थ्यांना पदवी प्रदान करून त्यांचा सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाच्या प्रमुख अतिथी गटशिक्षणाधिकारी डॉ.विद्या शेळके तसेच कार्यक्रमाचे अध्यक्ष फादर कुरिअर यांनी याप्रसंगी आपले मनोगत व्यक्त करून बालकांच्या कलागुणांचे भरभरून कौतुक केले. तसेच विद्यार्थ्यांना घडविणाऱ्या व त्यांना उत्कृष्ट मार्गदर्शन करणाऱ्या विद्यालयातील शिक्षकांचे अभिनंदन केले. विद्यालयाच्या मुख्याध्यापिका सिस्टर पावना यांनी सुद्धा याप्रसंगी आपले विचार व्यक्त केले.

कार्यक्रमाचे संचालन व आभार प्रदर्शन छोट्या छोट्या विद्यार्थ्यांनी उत्कृष्टरित्या पार पाडून कार्यक्रमात रंगत आणली. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शिक्षिका पल्लवी मेश्राम, हिना रामटेके, शालिनी जांभुळकर, वैशाली ठाकरे, रजनी गणवीर, अश्विनी किरमिरे, लेकराम डेंगे, शिक्षिका विजया लांजेवार, नंदा चिंचेकर, शिक्षक कुणाल डांगे तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

# १६ वर्षीय किरणला मिळाले नवजीवन

## तनय देशकर यांच्या मदतीने मोफत हृदय शस्त्रक्रिया

ब्रह्मपुरी/का.प्र.

ब्रह्मपुरी तालुक्यातील तळोधी खुर्द येथील १६ वर्षीय किरण अश्विन सहारे या मुलीवर गंभीर हृदयविकाराची यशस्वी शस्त्रक्रिया पार पडून तिला नवजीवन मिळाले आहे. विशेष म्हणजे ही शस्त्रक्रिया पूर्णपणे मोफत पार पडली. या संपूर्ण प्रक्रियेत भाजपा युवा मोर्चाचे जिल्हा सरचिटणीस तनय देशकर यांच्या पुढाकारासोबतच राज्याचे मुख्यमंत्री मा. देवेंद्रजी फडणवीस यांचे महत्त्वपूर्ण सहकार्य लाभल्याने सहारे कुटुंबाला मोठा दिलासा मिळाला आहे.



किरण सहारे ही हृदयविकाराच्या गंभीर आजाराने त्रस्त होती आणि तिच्यावर तातडीने शस्त्रक्रिया करणे अत्यावश्यक होते. या पार्श्वभूमीवर किरणचे आजोबा धनंजय सहारे यांनी तनय देशकर यांच्याशी दूरध्वनीवर संपर्क साधून किरणच्या वैद्यकीय उपचारासाठी मदतीची विनंती केली.

ही बाब समजताच श्री. तनय देशकर यांनी तातडीने पुढाकार घेत योग्य स्तरावर पाठपुरावा केला. या संपूर्ण प्रक्रियेत राज्याचे मुख्यमंत्री श्री. देवेंद्रजी फडणवीस यांचे मोलाचे सहकार्य त्यांना लाभले. यामुळे किरण सहारे हिची हृदय शस्त्रक्रिया यशस्वीपणे मोफत पार पडली. दरम्यान, ब्रह्मपुरी विधानसभेचे माजी आमदार, भाजपा नेते प्रा. अतुल देशकर, तनय देशकर यांनी पदाधिकाऱ्यांसह तळोधी खुर्द येथे भेट देऊन तिच्या प्रकृतीची विचारपूस केली.

या प्रसंगी भाजपचे तालुका उपाध्यक्ष तथा तळोधीचे सरपंच अनिल तिजारे, पूर्व तालुकाध्यक्ष प्राचार्य अरुण शेंडे, प्रा. रामलाल दोनाडकर, भास्कर तिजारे, धीरज पाल, धनंजय सहारे स्थानिक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# घरगुती गॅस वापरणाऱ्या दोन व्यावसायिक हॉटेल्सवर कारवाई

## इंधन साठवणूक व काळाबाजार रोखण्याकरीता ७ भरारी पथके तैनात

ब्रम्हपुरी/का.प्र.

जागतिक युद्धजन्य परिस्थितीमुळे भविष्यात निर्माण होणारा संभाव्य इंधन तुटवडा रोखण्यासाठी ब्रम्हपुरी तालुका प्रशासन आता 'ॲक्शन मोड' मध्ये आले आहे. घरगुती गॅस सिलेंडरचा अवैध व्यावसायिक वापर करणाऱ्यांवर तहसीलदारांनी कडक कारवाईचे निर्देश दिले असून, तालुक्यातील दोन नामांकित हॉटेल्सवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

जिल्हाधिकारी व जिल्हा पुरवठा अधिकारी यांच्या आदेशानुसार, तहसीलदार सतीश मासाळ यांच्या मार्गदर्शनात तालुक्यात विशेष तपासणी मोहीम राबवण्यात आली. या मोहिमेत ब्रम्हपुरी येथील 'गुलमोहर बिर्याणी सेंटर' व 'हिंदुस्थान हॉटेल' या दोन आस्थापनांमध्ये घरगुती गॅस सिलेंडरचा अवैध वापर करताना पथकास आढळून आले. याप्रकरणी पुरवठा निरीक्षक महेंद्र रामटेके यांनी 'जीवनावश्यक वस्तू अधिनियम १९५५' च्या कलम ३ व ७ नुसार संबंधित हॉटेल मालकांवर गुन्हे दाखल केले आहेत.

तालुक्यातील हॉटेल, रेस्टॉरंट्स, व्यावसायिक प्रतिष्ठाने आणि गॅस एजन्सींच्या गोदामांची नियमित तपासणी करण्यासाठी ७ विशेष पथके तयार करण्यात आली आहेत. यात पुरवठा निरीक्षण अधिकारी अमित कांबळे यांच्या नेतृत्वात महेंद्र रामटेके, दिलीप मेश्राम आणि राजेश आंबाघरे यांचे मुख्य पथक कार्यरत आहे. तालुक्यात सध्या ४ गॅस एजन्सी असून गॅसचा पुरेसा साठा उपलब्ध आहे. त्यामुळे नागरिकांनी घाबरण्याचे कारण नाही, असे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

# नारीशक्तीचा सन्मान हा भारत देशाचा सन्मान - डॉ. एस.एम. शेकोकर

## आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्य नारी शक्तीप्रदर्शन कार्यक्रम



ब्रम्हपुरी/का.प्र.

आपल्या देशाच्या इतिहासात महिलांचे आजतगायत मौलिक असे योगदान आहे. देशातील पहिल्या महिला पंतप्रधान स्व. इंदिरा गांधी, पहिल्या आद्य शिक्षिका व मुख्याध्यापिका क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले, पहिल्या आय. पी. एस. अधिकारी किरण बेदी, पहिल्या महिला डॉक्टर आंनदीबाई जोशी अशा अनेक महिलांनी देश सेवेसाठी स्वत: ला यात झोकून दिले. झाँशीची राणी लक्ष्मीबाई, अहिल्याबाई होळकर यांच्या शूर व वीरतेचा इतिहास प्रेरणादायी आहे. आज महिला कुठल्याच क्षेत्रात मागे नाही. ती पुरुषाच्या बरोबरीने कार्य करते. त्यामुळे स्त्री- पुरुष असा भेदभाव न करता समान दृष्टिकोनातून पाहणे आवश्यक आहे. आज समाजात स्त्रियांना तेवढेच मोलाचे स्थान आहे. आम्ही नेवजाबाई हितकारिणी महाविद्यालय, व शांताबाई भैया महिला महाविद्यालय ब्रम्हपुरी येथिल महिला वेल्फेअर समिती, राष्ट्रीय सेवा योजना व एन सी सी विभागाच्या वतीने विविध विभागातील संघर्षमय जीवन जगणाऱ्या महिलांचे सन्मान करण्याचे संस्थेचे सचिव अशोक भैया यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित केले होते. आमच्या महाविद्यालयाची परंपरा हीच आहे. 'मातृशक्ती भव' नारी अबला नसून ती सबला आहे. हा संदेश देण्यासाठी कार्यक्रमाचे आयोजन होते आणि म्हणून महिलांचा सन्मान हाच देशाचा सन्मान आहे. असे मार्मिक विचार डॉ एस एम शेकोकर यांनी व्यक्त केले.

यावेळी कार्यक्रमाला उपस्थित मेजर विनोद नरड, डॉ प्रकाश वट्टी महिला वेल्फेअर समितीच्या अध्यक्ष डॉ के के गील, सचिव डॉ दर्शना उराडे, सदस्या प्रा शिरिन खान, प्रा मनिषा लेनगुरे, प्रा ओजस्विनी बावणकुळे, प्रा. प्रियंका उईके, डॉ हर्षा कानफाडे व डॉ प्रतिभा कढव या उपस्थित होत्या. यावेळी पोलिस विभागातील शिवानी कांबळे, नगरपरिषद सफाई कामगार, ममता बोरकर, कल्यानी गडे नर्स विभाग, मनिषा टिकले बस वाहक व लता बावणकुळे या दही विक्रेत्या या सर्व महिलांचा आंतरराष्ट्रीय महिला दिनाचे औचित्य साधून भेटवस्तु देवून त्यांचा सन्मान करण्यात आले. याप्रसंगी नारीशक्ती आजच्या युगात कमी नाही हे दाखवितांना कराटे प्रकारातील मुलींव्दारे कौशल्य दाखविण्यात आले.

कार्यक्रमाचे संचालन डॉ दर्शना उराडे यांनी केले तर आभार प्रा. प्रियंका उईके यांनी मानले. कार्यक्रमाचे व रँलीचे आयोजन राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी प्रकाश वट्टी, डॉ दर्शना उराडे, संजू मेश्राम यांनी परिश्रम घेतले.

---

# एल.एम.बी. पब्लिक स्कुलमध्ये सरोजनी नायडू यांची जयंती उत्साहात संपन्न

ब्रम्हपुरी/का.प्र.

भारताच्या पहिल्या महिला राज्यपाल बनुन इतिहास रचणाऱ्या सरोजिनी नायडू यांची जयंती १३ फेब्रुवारीला एल. एम. बी. पब्लिक स्कुल ब्रम्हपुरी येथे उत्साहात साजरी करण्यात आली. सरोजिनी नायडू ह्या राजकीय कार्यकर्त्याच नाही तर कवयित्री सुध्दा होत्या. १९९२ मध्ये प्रकाशित 'इन द बाजार्स ऑफ हैद्राबाद' ही त्यांची सर्वात लोकप्रिय कविता आहे. सरोजिनी नायडू यांना 'भारताची कोकीळा' ही उपाधी महात्मा गांधी यांनी दिली होती.

कार्यक्रमाची सुरूवात स्कुलच्या संचालिका अशिता भैया मॅडम यांनी सरोजिनी नायडू यांचा प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. यावेळी स्कुलचे प्राचार्य कादिर कुरेशी सर, उपप्राचार्य रश्मी राठी मॅडम व पर्यवेक्षिका रश्मी झोडे मॅडम उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन ५ व्या वर्गातील ज्युपिटरची विद्यार्थीनी उन्नती राऊत हिने केले. तसेच सरोजिनी नायडू यांची वेशभुषा ५ व्या वर्गातील मरक्युरी सेक्शनची विद्यार्थीनी स्वरा डोहे हिने साकारली. याप्रसंगी स्कुलमधील सर्व शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.






---

# ब्रम्हपुरी नगर परिषदेचा वसुली धडाका सुरू

## थकबाकीदारांची मालमत्ता सील, ५ पथकांकडून धडक कारवाई

ब्रम्हपुरी/का.प्र.

मालमत्ता आणि पाणीपट्टी कराची थकबाकी न भरणाऱ्यांविरुद्ध ब्रम्हपुरी नगर परिषदेने आता आक्रमक पवित्रा घेतला आहे. मुख्याधिकारी डॉ. माधुरी सलामे यांच्या नेतृत्वाखाली शहरात जोरदार वसुली मोहीम राबवण्यात येत असून, गुरुवारी (१२ मार्च) ५ पेक्षा जास्त वर्षे कर थकीत असलेल्या मालमत्तांवर जप्तीची कारवाई करण्यात आली. यामुळे शहरातील बड्या थकबाकीदारांचे धाबे दणाणले आहेत.

शासनाने दिलेले कर वसुलीचे उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी मुख्याधिकाऱ्यांनी सर्व विभागातील अधिकारी व कर्मचारी यांची एकूण ५ विशेष वसुली पथके तयार केली आहेत. महाराष्ट्र नगर परिषद अधिनियम १९६५ च्या कलम १५२ नुसार, ६ मार्च रोजी अनेक थकबाकीदारांना जप्तीच्या नोटिसा बजावण्यात आल्या होत्या. नोटिसीची मुदत संपताच ही कारवाई प्रत्यक्ष मैदानात उतरून सुरू करण्यात आली आहे. वारंवार सूचना देऊनही कर न भरल्यामुळे गुरुवारी करण्यात आलेल्या कारवाईत श्रीमती कमलाबाई सुखदेवप्रसाद दुबे यांची मालमत्ता नगर परिषद प्रशासनाकडून सील करण्यात आली. छत्रपती शिवाजी महाराज चौकातील व्यावसायिक रहीम महंमदभाई बाबवाणी यांच्याकडे जप्ती पथक पोहोचताच, त्यांनी दंडासह कराची संपूर्ण रक्कम तातडीने जमा केली, ज्यामुळे त्यांच्यावरील जप्तीची कारवाई थांबवण्यात आली. अनेक मालमत्ताधारकांनी पथक दारात येताच कारवाईच्या भीतीने थकबाकीचा भरणा केला.

१५ मार्च पूर्वी आपल्या मालमत्ता व पाणीकराची संपूर्ण रक्कम दंडासह कार्यालयात जमा करावी. मुदतीनंतर कोणत्याही प्रकारची सवलत न देता कठोर कारवाई केली जाईल, असे न.प. प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

---

**... QUOTES ...**

"Success is not the key to happiness. Happiness is the key to success. If you love what you are doing you will be successful."

- Albert Schweitzer

---

# नाट्यसंगीत स्पर्धेत ने.हि. महाविद्यालयाचा सुधीर अव्वल

ब्रम्हपुरी/का.प्र.

गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली अंतर्गत नुकताच दिनांक ५ ते ०७ मार्च २०२६ रोजी आंतरमहाविद्यालयीन सांस्कृतिक युवा महोत्सव 'घे भरारी'- २०२५-२६ मोठ्या थाटामाटात साजरा करण्यात आला. यामध्ये नेवजाबाई हितकारिणी महाविद्यालयातील बी. ए. तृतीयचा विद्यार्थी नामे सुधीर रमेश देशमुख याने नाट्यसंगीत सांस्कृतिक स्पर्धेत प्रथम, तर सुगम संगीत या स्पर्धेमध्ये तृतीय पुरस्कार पटकावला.

त्याचबरोबर कु.समीक्षा पंडित, कु. चिन्मयी मडावी यांनी वाद-विवाद स्पर्धेमध्ये सहभाग दर्शविला. तसेच शास्त्रीय तालवाद्य (तबला) या स्पर्धेमध्ये मानस गेडाम या विद्यार्थ्यांने सहभाग दर्शविला. तर वक्तृत्व स्पर्धेमध्ये पदव्युत्तर विभागाची कु. समीक्षा पंडित हिने मोठ्या हिरीरीने सहभाग घेतला. या विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल नेवजाबाई भैया हितकारिणी शिक्षण संस्थेचे सचिव अशोक भैया यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले. महाविद्यालयाचे कार्यकारी प्राचार्य डॉ. सुभाष शेकोकर व सांस्कृतिक विभागप्रमुख डॉ. पदमाकर वानखडे, डॉ. धनराज खानोरकर यांनी पुष्पगुच्छ देऊन विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

---

**चारोळी**

सामुहिक लग्नसोहळयात ते
दरवर्षी बोहल्यावर दिसले...
प्रत्येकदा नवरी बदलली तरी,
त्यांनी आपले स्थान कायम ठेवले

रचनाकार : डॉ. राजन जयस्वाल

# एलएमबी स्कुलमध्ये सुभाषचंद्र बोस जयंती





ब्रम्हपुरी/का.प्र.

एल. एम. बी. पब्लिक स्कुल, ब्रम्हपुरी येथे शनिवार दि. २४ जानेवारी २०२६ ला भारतीय स्वातंत्रलाढ्यातील एक प्रमुख कांतीकारक, धाडसी नेते आणि महान देशभक्त नेताजी सुभाषचंद्र बोस यांची जयंती साजरी करण्यात आली.

एल. एम. बी. स्कुलमध्ये नेहमीच विविध कार्यक्रमाचे आयोजन करीत असते. अनेक थोर पुरूषांच्या कार्याचे महत्व जयंती दिनाच्या निमित्याने विद्यार्थ्यांसमोर सादर करीत असते. स्कुलचे प्राचार्य कादिर कुरेशी सरांनी सुभाषचंद्र बोस यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाची सुरूवात करण्यात आली.

इयत्ता ८ वी चा विद्यार्थी ध्यास मेश्राम हा सुभाषचंद्र बोस यांच्या वेशभुषा साकार करून याने विद्यार्थ्यांना 'तुम मुझे खून दो, मैं तुम्हे आजादी दूंगा', जय हिंद' हे प्रसिध्द घोषवाक्य देऊन आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे संचालन आणि आभार प्रदर्शन इयत्ता ७ वी ची प्रिन्सी शेकोकर या विद्यार्थीनीने केला.

कार्यक्रमाप्रसंगी शाळेच्या संचालिका, प्राचार्य, उपप्राचार्य, पर्यवेक्षिका तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

Miracle constructions & Developers

श्रीराम नगरी - डेव्हलपर्स

NATP प्लॉट्स उपलब्ध

- सिंदेवाही
- नवरगांव
- तळोधी
- चंद्रपुर (चोराळा)

संपर्क : अनिल दोनाडकर

मो. 8806776699, 9834946501

डुप्लेक्स बांधकाम करून मिळेल.



प्रो.प्रा. सुरेश सोरते

मो. 8698323337

सोरते स्टेनलेस स्टील वर्क्स

गीत (बुरले) पेट्रोल पंपसमोर नागभीड रोड, ब्रम्हपुरी

रेलींग, ग्रिल व गेट स्टिलचे नावे बनवून मिळेल.






# नेवजाबाई हितकारिणी महाविद्यालयात एनसीसी 'बी' प्रमाणपत्र परीक्षा संपन्न

ब्रह्मपुरी/का.प्र.

स्थानिक नेवजाबाई हितकारिणी महाविद्यालय, ब्रह्मपुरी येथे २० महाराष्ट्र बटालियन आणि ३ महाराष्ट्र बटालियन च्या कॅडेट्ससाठी 'बी' (B) प्रमाणपत्र परीक्षा नुकतीच अत्यंत शिस्तबद्ध वातावरणात पार पडली. ही परीक्षा दोन टप्प्यांत घेण्यात आली, ज्यामध्ये १४ मार्च २०२६ रोजी प्रात्यक्षिक (Practical) परीक्षा आणि १५ मार्च २०२६ रोजी लेखी (Written) परीक्षा संपन्न झाली.



या परीक्षेचे संचालन २१ महा बटालियन एनसीसी नागपूरचे लेफ्टनंट कर्नल जिसान्तो आणि ३ महा इंजिनिअर्स एनसीसी नागपूरचे लेफ्टनंट कर्नल गोनोला यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले. १४ मार्च रोजी झालेल्या प्रात्यक्षिक परीक्षेमध्ये कॅडेट्सच्या विविध कौशल्यांची चाचणी घेण्यात आली. यामध्ये प्रामुख्याने ड्रिल (Drill), शस्त्र हाताळणी (Weapon Training), नकाशा वाचन (Map Reading), क्षेत्रकला आणि युद्धकला (FCBC - Field Craft and Battle Craft) तसेच संपर्क कौशल्य (Communication) या विषयांवर कॅडेट्सनी आपले कसब दाखवले. १५ मार्च रोजी झालेल्या लेखी परीक्षेत कॅडेट्सनी एनसीसीच्या अभ्यासक्रमावर आधारित प्रश्नांची उत्तरे दिली.

याप्रसंगी कॅप्टन कुलजीत कौर गिल, कॅप्टन अभिजित एस. परकरवार, लेफ्टनंट सरोज शिंगाडे आणि फर्स्ट ऑफिसर हेमकांता बावनकुळे यांची विशेष उपस्थिती होती. परीक्षेच्या तांत्रिक आणि प्रशिक्षणाच्या बाजू सांभाळण्यासाठी सुभेदार जयमल सिंग, हवालदार सरवण सिंग, हवालदार जगतार सिंग आणि हवालदार बलबीर सिंग यांनी मोलाचे सहकार्य केले. एन एच कॉलेज चे कार्यकारी प्राचार्य डॉ एस एम शेकोकर यानी भेट देऊन कैडेट्सना मार्गदर्शन केले आनी शुभेछा दिल्या.

या संपूर्ण परीक्षेच्या सफलतेसाठी एनसीसी ऑफिसर कॅप्टन अभिजित एस. परकरवार आणि केअरटेकर ऑफिसर रेवनदास म. बोरकर यांनी विशेष परिश्रम घेतले. एन एच कॉलेज ब्रह्मपुरी केंद्रावर पार पडलेल्या या परीक्षेत २० आणि ३ महाराष्ट्र बटालियनच्या कॅडेट्सनी मोठ्या उत्साहात सहभाग नोंदवला.

# चिंचोली बुज येथे उर्स महोत्सव व दुय्यम कव्वालीचा कार्यक्रम

ब्रम्हपुरी/का.प्र.

अल्हाज हजरत सैय्यद मोहम्मद इकबालशाह बाबा उर्फ बाबाजान कादरी चिश्ती चिंचोली (बु) ता. ब्रम्हपुरी येथे २१ वर्षापासून परंपरा कायम राखून, दरवर्षी प्रमाणे यावर्षी दि. २२ मार्च २०२६ रोज रविवारला रात्री ८ वाजता आदरणीय अम्मासाहेब, शफीबाबा, शरीफबाबा यांच्या मार्गदर्शनाखाली ऊर्स मुबारक तसेच विद्यार्थाचे व मान्यवरांचे जाहीर सत्कार तसेच शानदार दुय्यम कव्वालीचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येणार आहे.

सदर कार्यक्रमाला विधी मंडळ काँग्रेस नेते तथा ब्रम्हपुरी विधानसभा क्षेत्राचे आमदार विजय वडेट्टीवार, आमदार बंटीभाऊ भांगडीया, आमदार किशोर जोरगेवार, आमदार रामदास मसराम, आमदार अभिजीत वंजारी आमदार सुधाकर अडबले, योगेश मिसार नगराध्यक्ष न.प.ब्रम्हपुरी, लताबाई सुंदरकर नगराध्यक्षा न.प.देसाईगंज, माजी नगराध्यक्ष एहतेशाम अली वरोरा, माजी आमदार कृष्णा गजबे, मोतीलाल कुकरेजा उपाध्यक्ष भाजपा गडचिरोली, तुषार सोम भाजपा प्रदेश कार्यकारनी सदस्य, महेंद्र ब्राम्हणवाडे जिल्हाध्यक्ष काँग्रेस कमिटी गडचिरोली, डॉ.नितीन उराडे उपाध्यक्ष न.प.ब्रम्हपुरी, सतिश वाजूरकर उपाध्यक्ष ओबीसी महासंघ प्रदेश, देशक खोब्रागडे अध्यक्ष खोरीपा, माजी आमदार अतुलभाऊ देशकर, किसन नागदेवे जिल्हाध्यक्ष भाजपा गडचिरोली, डी.डी.राजपूत उपविभागीय पोलीस अधिकारी ब्रम्हपरी, प्रमोद बानबले पोलीस निरिक्षक ब्रम्हपुरी, गजानन ढोरे सरपंच उपस्थित राहणार आहेत.

ब्रम्हपुरी समाचारच्या अंकाकरीता

www.bramhapuri samachar.com/bs

या ऑनलाईन साईटला भेट द्या

बातम्यांकरीता संपर्क :

मो. 9503100964

मो. 8275715315




Lubi PUMPS-MOTORS

बुधवार बंद

- दुकानाची वेळ - सकाळी १० ते सायं. ६ वा.

सी.आर.आय. मोटारपंपचे विदर्भातील प्रथम अधिकृत विक्रेता

गणेश ॲग्रीकल्चरल एजन्सी

रेल्वे स्टेशन रोड, खानोरकर भवन, भगतसिंग चौक, ब्रम्हपुरी

फोन नं. (07177) 272573 मोबाईल क्र. 9423115853, 7083214053

Kirloskar

CRI

ISO : 9001 : 2015 मानांकन प्राप्त दुकान

1994 पासून आपल्या सेवेत

किर्लोस्कर, एनसंस, लुबी, मोटार पंप, उषा, होन्डा, कॉमेट इंजीन, राज पी.व्ही.सी. पाईप, स्प्रिंकलर पाईप, आटा चक्की, हॅण्डपंप, केबल वायर व स्पेअर पार्टचे विक्रेता


Printed by Rajiv Pachpor published by Ashok Kisanlalji Bhaiya on behalf of Ashok Kisanlalji Bhaiya and printed at Aqua Process, Modi No.1, Sitabuldi, Nagpur and Published at Bramhapuri Samachar Office, Wadsa Road, Bramhapuri Editor Ashok Kisanlalji Bhaiya MAHMUL/2016/69789 Mob. 9422135404